# संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांचे निवडक अभंग

प्रा.दिलीप ज्ञानोबाराव भिसे
मराठी विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड

वारकरी संप्रदायातील अधिकारी संत म्हणून संत ज्ञानेश्वर यांचा लौकिक आहे. निवृत्तीनाथ, सोपानदेव, ज्ञानेश्वर व मुक्ताबाई अशी चार भावंडे या संप्रदायातील दिशादर्शक ठरली. ज्ञानेश्वरी अर्थात भावार्थदीपिका हा ग्रंथ संत ज्ञानेश्वरांनी लिहिला. ज्ञानेश्वरीला 'देशीकार लेणे' असे संबोधले गेले. यासोबतच अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरीपाठाचे अभंग असे साहित्य त्यांनी लिहिले. प्रतिभासंपन्न कवी, तत्त्वचिंतक व समाजमनावर प्रभाव टाकणारा नीती शिक्षक म्हणून ज्ञानेश्वर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली वयाच्या केवळ 21 व्या वर्षी म्हणजेच इ. सन 1296 मध्ये त्यांनी आळंदी येथे जीवनाची पूर्तता केली.संत ज्ञानेश्वरांचा प्रत्येक अभंग अथवा ओवी विचाराचा, ज्ञानाचा अथांग सागर भासते.

**संत ज्ञानेश्वरांचे चार अभंग:**

**निर्जीवा दगडाची काय करशील सेवा...** या अभंगात ते म्हणतात, की निर्जीवा दगडाची काय करशील सेवा म्हणजेच संत ज्ञानेश्वरांनी माणसात देव असून दगडात देव शोधणाऱ्यांना सावध केले आहे. दगड हा निर्जीव असतो. निष्प्राण असतो. तो जिवंत माणसाची पिडा, दु:ख दूर करू शकत नाही मात्र माणसांमध्ये वावरत असताना लोकांनी जनसेवा केली पाहिजे. मानव सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा आहे. या सेवेतच देवरूप असते असे म्हटले आहे. तीर्थयात्रा हा खर्च आणि वेळ घालवणारा घटक आहे. यापेक्षा विठ्ठलाच्या चरणी सर्व तीर्थे सामावली आहेत. म्हणून विठ्ठल भक्तीत आपण रममान झालं पाहिजे, असे ते म्हणतात. माणसाचा देह हाच एक विठ्ठलाचा अंश असतो. तेच देऊळ असते. माणसाच्या मनातच तीर्थक्षेत्र रुजलेले असते. व्रतवैकल्य, पूजाअर्चा, दगडाचा देव, तीर्थयात्रा या सर्व गोष्टींमध्ये रमबाण होणे व्यर्थ आहे तर भक्ती मार्गानेच मुक्ती मिळू शकते आणि मानवसेवेतूनच खरे सुख मिळू शकते, असे संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

**चोराचीया संगे क्रमित्ता पै पंथ असा आहे ...** या अभंगातून समाजामधील वाईट,खोट्या लोकांवर प्रहर केला आहे. दुष्ट, चोर, कपटी कारस्थानी करणारे माणसे समाज बिघडण्याचे काम करत असतात. आपण मात्र अशा लोकांपासून सावध राहायला पाहिजे. आपल्यातील काम, क्रोध, लोभ वगळून जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्याचे आपल्या रागावर मनावर नियंत्रण नसते तो कधीच परमार्थ करू शकत नाही. शुद्ध अंतकरण असल्याशिवाय परमार्थाची भेट होणार नाही. प्रचंड वजनाची दगडी शीळ बांधून नदीत

पोहण्याचा प्रयत्न केला तर मृत्यू अटळ आहे हे जीवन सुखकारकपणे तरुन जाण्यासाठी,संपन्न करण्यासाठी संतांची सोबत असणे गरजेचे आहे. उत्तम माणसांच्याकडे गुणांची खाण असते. त्यांच्यासोबत राहून आपणही गुणी सद्वर्तनी होणे हे जीवनाचे साध्य ठेवले पाहिजे. त्यामुळे देहभ्रांती सोडून आपण मनाला शुद्ध करण्याचा प्रयत्न केला पाहिजे खरी भक्ती आणि साधना हीच सुखाची पायवाट आहे, असे संत ज्ञानेश्वर म्हणतात.

**कापुरा अग्नी स्नेह झाला**....हा अतिशय अर्थपूर्ण अभंग... कापूर आणि अग्नी यांचा एकत्रीकरण झाले असता ज्योत प्रज्वलित होते, ही प्रकाशाची ज्योत असते, त्या पद्धतीने सामान्य माणूस आणि संत एकत्र आले किंवा भक्त आणि परमेश्वर एकत्र आले तर त्या व्यक्तीमधील 'मी' पणा नाहीसा होतो. वाईट गुण नाहीसे होतात आणि शुद्ध अंतकरण असलेला माणूस आकाराला येतो. सामान्य माणूस जसा देवाचा शोध घेताना देवळातील मूर्तीकडे पाहत राहतो, मात्र देव त्या मूर्तीतच नसतो तर प्रत्येक घटकांमध्ये, चराचरात असतो. देवळात देव शोधण्यापेक्षा मनातच देव शोधण्याचा प्रयत्न मनुष्याने केला पाहिजे. यातून ज्ञानेश्वरांनी अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केलेला आहे.

**ये साते आलिया वोळंगा सारंगधरू**...या अभंगात ज्ञानेश्वरांनी संसार आणि परमार्थ यामध्ये समन्वय साधला आहे. वरुवरून भला वाटणारा संसार लोभाविना अतिशय सावधपणे केला पाहिजे, खरंतर संसार हा नश्वर असतो, कायमस्वरूपी नसतो मात्र मनुष्य संसारालाच आपले सर्वस्व मानून त्यात गुंतून जातो संसारासाठी सर्वस्व त्याग करूनही त्याला सुख समाधान प्रेम मिळत नसेल तर अशा संसाराचा काय उपयोग असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. संसारातील आपले गणगोत हे केवळ स्वार्थातून निर्माण झालेले नातेबंध असतात. मृगजळासारखे त्याचे अस्तित्व असते ज्याप्रमाणे बेगड रंगेबिरंगी असते मात्र दोन दिवसातच त्याचा रंग उडून जातो त्या पद्धतीने नात्याचे स्वरूप असते. स्वार्थ असेपर्यंत नाते टिकून असते, स्वार्थ संपला की नातेही संपून जाते म्हणून विठ्ठलचा धावा करणे, देवाची भक्ती करून स्वत:चा उद्धार करणे यात खरे सुख आहे, असे सुख कायमस्वरूपी असते. ते प्राप्त करण्यासाठी प्रत्येकाने धडपड केली पाहिजे, असे विचार ज्ञानेश्वरांनी मांडले आहेत. विठ्ठल भक्तीचा मार्ग जो संसार आणि परमार्थ यांचा योग्य समन्वय साधतो, तोच खरा भक्त असतो. संसार कर्मा सोबतच परमार्थ कर्म करणे हेही उद्दिष्ट असले पाहिजे, असा संदेश संत ज्ञानेश्वर या अभंगातून देतात.

**संत नामदेव पाच अभंग :**

आम्हा सापडले वर्म, करू भागवत धर्म,असे नामदेवाची प्रतिज्ञा होती. शतकोटी तुझे करीन अभंग अशीही नामदेवांनी प्रतिज्ञा केली होती. आज सुमारे अडीच हजार अभंग संत

नामदेवांचे उपलब्ध आहेत. संत नामदेव यांनी विविध रचना अभंग रचना निर्माण केली. आत्मचरित्रपर अभंग, बाळक्रीडेचे अभंग, संत नामदेवजी की मुखबानी( हिंदी कविता) ज्ञानेश्वर चरित्र, गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा यांचेही चरित्र नामदेवांनी आपल्या काव्यातून लिहिले. म्हणून संत नामदेवांना तेराव्या शतकातील पहिले काव्य चरित्रकार मानले जाते. संत नामदेवांना ज्ञानेश्वराविषयी खूप आदरभाव होता. ते म्हणतात की "ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी एक तरी ओवी अनुभवावी"असे हे संत नामदेव उत्तर काळामध्ये पंजाबकडे गेल्याचे निदर्शनास येते. पंजाबमध्ये राहून भागवत संप्रदायाचा प्रसार करून त्यांनी अनेक रचना हिंदी भाषेतून लिहिले आहे.

**मनाचे मनपण सांडता रोकडे...**या अभंगांमध्ये संत नामदेवांनी भक्तीचे महत्त्व सांगितले आहे. शुद्ध मनाने केलेली भक्ती योग्य असते असे म्हटले आहे. आपल्या मनातील 'मी'पणा सोडून द्यायला हवा. मनातील गर्व, अलंकार, 'मी'पणा हे आपल्या भक्तीला अडसर ठरत असतात. यांचा त्याग केल्याशिवाय आपल्या अंतर्मनातील परमेश्वराशी आपण एक जीव होऊ शकत नाही. अंतर मनात असलेल्या पामार्थाची ओळख पटल्याशिवाय आपल्याला खरी भक्ती कळत नाही. यासोबतच जो क्षणिक सुख देणारा प्रपंच आहे. संसार आहे तोच आपण सर्वस्व मानून राहता कामा नये. आपला विकास कशात आहे. आपले सुख कशामध्ये आहे. याचा सर्वार्थाने विचार करून आपण जीवन जगले पाहिजे. संत नामदेवांनी म्हटले आहे की अजूनही वेळ गेली नाही आपण आपले जगणे सुंदर करण्यासाठी आपले जगणे सुखमय करण्यासाठी या संसाराचा त्याग केला पाहिजे व परमेश्वराच्या चरणी नतमस्तक होऊन आपण भक्तीचे सुख खरा आनंद उपभोगला पाहिजे असे म्हटले आहे

**धनमानबळे नाठविसी देवा...** हा अभंग हे माणसाला कसे जगावे जीवनाचे सार्थक कशात आहे याचे मार्गदर्शन करतो धन म्हणजेच पैसा मान म्हणजेच सन्मान सर्वोच्च पद आणि बळ म्हणजेच शक्ती ताकद या सर्वांचा आपल्याला गर्व असता कामा नये या सर्व गोष्टी येतात जातात कायमस्वरूपी या गोष्टी कधीच नसतात म्हणून याच प्राप्त करण्यामध्ये आपल्या आयुष्य घालवता कामा नये कारण याच गोष्टी मृत्यू समयी कामी येत नाही मृत्यू समय का मिळते ते आपले माणूस पण आपले भक्तीमय जगणे म्हणून या गोष्टीचा नेहमी त्या करायला शिकले पाहिजे असे संत नामदेवांनी म्हटले आहे मृत्यू जेव्हा येतो एमदेवाच्या रूपामध्ये तेव्हा तुझे रक्षण करण्यासाठी ना हे पद येतं पैसा येतो ना तुझी ताकद येते एवढेच नव्हे तर माय बाप बंधू सगळे सोयरे हेही आपले कधीच नसतात जोरी आपण सक्षम असतो आपण कमावते असतो तोपर्यंत ही सगळी मंडळी आपले असतात मात्र आपल्या अवतारवयामध्ये आपल्या संकटामध्ये यापैकी कोणीच कामाला येत नाही सगळे काही

आपल्यालाच भोगावयाचे असते असे संत नामदेवांनी म्हटले आहे एवढेच नाही तर आपले पत्नी जी आपल्या सोबत सदैव राहिलेली असते ती देखील आपल्या मृत्यूनंतर शोक व्यक्त करते परंतु परंतु रूढी परंपरेनुसार तिचे केशव पण होताच तिला प्रचंड दु:ख होते म्हणजेच आपल्यासाठी ते केशव पण त्याग करायला ही तयार नसते याचाच अर्थ संत नामदेवांनी म्हटले आहे की या संसारात जीवन जगत असताना आपण आपले सुख संसाराचे सुख मनुष्य पण घेऊन जगले पाहिजे त्यात खरा आनंद आहे

**शेवटली पाळी तेव्हा मनुष्य जन्म...** हा अभंग विचार प्रवर्त करणार आहे खूप जन्माच्या फेऱ्यानंतर मनुष्यजन्म प्राप्त होतो हे आपल्यासाठी खूप मोठी आहे परमेश्वराचे सुख प्राप्त करून घेण्यासाठी प्रचंड पुण्याची कमाई करून आनंद मिळवण्यासाठी ची मनुष्यजन्म एक उत्तम संधी असते ही संधी चुकवता कामा नये कारण मनुष्य जन्म हा पुन्हा पुन्हा मिळणारे बाब नाही एकदा संधी मिळाली की आपण तिचे सार्थक केले पाहिजे तरच आपल्याला पुढील काळामध्ये मनुष्य जन्म प्राप्त होऊ शकतो हे सर्व होण्यासाठी आपण आपल्यातील अंतर्मनाला जागृत केला पाहिजे आपले अंतर्मन शुद्ध ठेवून आपण वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे केवळ आपल्या संसारात दंगल होतात आपल्या संसाराचा उपभोग न घेता आपण विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक झाले पाहिजे कारण नामस्मरण मध्ये खूप आनंद आहे विठोबाच्या चरणी खूप आनंद आहे आपण विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक झाल्यानंतर विठ्ठल आपले सर्व दु:ख दूर करतो आपल्याला सुखी करतो आपल्याला सर्वोच्च आनंद देतो म्हणून आपण या मनुष्य जन्माचे सार्थक करून जगले पाहिजे लागले पाहिजे असे नामदेवांनी म्हटले आहे

**देहाचे महत्त्व नाही जो तुटले...** हा अभंग ही संसारातील सुखापेक्षा परमेश्वराच्या सहवासाचे सुख सर्वोच्च आहे या संदर्भात मार्गदर्शन करते आपण आपल्या बाह्य देहालाच सजवण्याचा प्रयत्न करीत असतो परंतु आपले अंतर्मन सर्वात महत्त्वाचे असते ते अंतर्मनाला आपण जितके समृद्ध करू जेवढे प्रेमळ करू जेवढे भक्तिमय करू तेवढे तुमच्यासाठी तुमच्या माणूस जन्मासाठी अतिशय महत्त्वाचे असते मात्र आपण बाह्य जगालाच महत्व देणारे मानसिकता ठेवून वागत असतो संसारातील विविध गोष्टी आपल्याला खेचून घेत असतात आपणही त्याकडे खेचले जात असतो मात्र नित्य आणि कायमचे सुख कशात आहे हे आपण जाणले पाहिजे आणि हे सुख आहे विठ्ठलाच्या भक्ती मध्ये विठ्ठलाला शरण जाण्यामध्ये काही लोक येतात मीच सर्वश्रेष्ठ भक्त आहे हे आपल्या वर्तनातून आणि भाषेतून समाजमनावर बिंबवण्याचा प्रयत्न करत असतात मात्र परमेश्वराला सर्व ठाऊक असते कोण खराब होत आहे कोण ढोंगी बघता आहे त्यामुळे असे खोटे पण घेऊन वागता कामा नये अशा लोकांना संत

नामदेवांनी पापी दुराचारी धुंगी फसवणूक करणारे वाईट मनाचे असे म्हटले आहे उलट यात त्या व्यक्तीचाच मोठा रास असतो त्या व्यक्तीचेच मोठे नुकसान असते कारण एक ना एक दिवस खरे रूप बाहेर पडतेच या सर्व वाईट प्रवृत्ती बाजूला सारून नामदेव म्हणतात त्याप्रमाणे ईश्वराची कृपा प्राप्त करून घेणे हाच सर्वात मोठा सर्वात सुंदर मार्ग सुखाचा आहे विठ्ठलाची भक्ती करून प्रेम मिळवण्याचा हा एकमेव मार्ग आहे असे संत नामदेवांनी म्हटले आहे

**मिथ्या माया जाळ मृगजळ बाधा..** हा अभंग ही संसारातील मायाजाळ मृगजळ विशद करून भक्तांना सावध करणार आहे संसारामध्ये कितीही कष्ट उपसून प्रचंड प्रयत्न करून आपण सुखी होऊ शकत नाही ज्या पद्धतीने एखादा मूर्ख व्यक्ती पाठीला संसारात खूप बंधने असतात भक्तीमध्ये बंधने नसतात निर्जळा म्हणजेच कडकडीत उपास करण्याची देखील गरज नसते केवळ सुद्धा अंतकरणाने भक्ती भाव जपला तो खरा भक्त असतो आपले पुत्र बंधू यांना आपण कितीही आपले मानत असलो तरी आपल्या निर्वाणीच्या काळात म्हणजेच अंत्यसमयी ते आपला मृत्यू थांबवू शकत नाही आपल्याला वाचू शकत नाही त्यामुळे आपण संसाराच्या मोहा मध्ये न अडकतात कायमस्वरूपी सुख विठ्ठलाच्या भक्ती मध्ये आहे तेच प्राप्त करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे म्हणजेच या सर्व अभंगातून संत नामदेवांनी संसारात झिजून जाण्यापेक्षा भक्तीमध्ये एकरूप होणे हेच खरे मनुष्याचे सध्या असले पाहिजे भक्ताचे साध्य असले पाहिजे असे सांगितले आहे.

संदर्भ:

१.प्राचीन मराठी संतकवी -संपादक ज.र.आजगावकर

२. नामदेव गाथा : संपादक हरी श्रीधर शेणोलीकर

३. श्री. नामदेव दर्शन संपादक रेळेकर,मिरजकर,इनामदार

**संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांचे निवडक अभंग**

प्रा.दिलीप ज्ञानोबाराव भिसे